प्रेसनोट

दिनांक २९/१२/२०१८

**रहाटी सज्जा ता.भोकर येथील तलाठी व्ही.एस.गलंडे, यांनी ३,०००/—रु. लाचेची मागणी केल्या बाबत पोलीस ठाणे भोकर येथे नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला**

यातील तक्रारदार यांनी दिनांक २७/१२/२०१८ रोजी तक्रार दिली की, " त्यांचे आई वडीलांचे नावे असलेली शेती तक्रारदार, त्यांचे तिन भाऊ व एक बहीणीच्या नावे फेरफार करून सातबारावर नोंद घेण्यासाठी वारसा प्रमाणे प्रत्येकी ४,०००/—रू.रहाटी सज्जाचे तलाठी गलंडे यांनी लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली".

सदर तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक २७/१२/२०१८ रोजी भोकर येथील तलाठी गलंडे यांचे खाजगी कार्यालय परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये तक्रारदाराचे नमुद कामासाठी तलाठी गलंडे यांनी तडजोडीअंती प्रत्येकी ३,०००/—रुपये लाचेची मागणी करून मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन तलाठी व्ही.एस.गलंडे नेमणुक सज्जा रहाटी ता.भोकर यांचे विरूध्द पो.स्टे. भोकर जि.नांदेड, गु.र.नं.३७१/२०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन) अधिनियम २०१८ कलम ७ नुसार गुन्हा दाखल करून तपास पोलीस निरीक्षक श्री प्रमोद उलेमाले लाचलूचपत प्रतिबंधक विभाग नांदेड हे करीत आहेत.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रंमाक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रंमाक ०२४६२—२५३५१२
३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रंमाक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

सविनय सादर

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.